**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य विशिष्ट प्रकारच्या टोप्या व गमछा परिधान करुन आल्याबाबत.**

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजर आहे. मी जाणून घेऊ इच्छितो की, या सभागृहात विशिष्ट प्रकारचा गमछा किंवा टोपी परिधान करुन येण्यास परवानगी आहे काय, नसल्यास, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना ते काढण्याबाबतचे आपण निदेश द्यावेत.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे यांचा पॉईंट ऑफ प्रोसीजर बरोबर आहे. जर अशी परंपरा नसेल तर मला वाटते सन्माननीय सदस्यांनी गमच्छा व टोप्या काढून टाकणे बरे होईल.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे.

## पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ई-लर्निंग व सौरऊर्जा विद्युतीकरण सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * १२५२१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ई-लर्निंग सुविधा व सौरऊर्जा विद्युतीकरण करण्याबाबत जिल्हा वार्षिक योजना नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत कोकण पदवीधर लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री यांच्यामार्फत जिल्हा प्रशासनास पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळांना ई-लर्निंग सुविधा मिळण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव जिल्हा परिषद शिक्षण विभाग पालघर येथे सादर करुनसुद्धा जिल्हा परिषदेने सदर प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे पाठविला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर सारख्या आदिवासीबहुल जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा परिषद प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना ई-लर्निंग व सौरऊर्जा विद्युतीकरण सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार, श्री.हसन मुश्रीफ यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) विधानपरिषद सदस्य, कोकण पदवीधर मतदार संघ यांनी पालकमंत्री पालघर जिल्हा यांना दिनांक ०५/०३/२०२१ च्या पत्रान्वये प्रस्ताव दिला आहे. मात्र सदर पत्र जिल्हा परिषद, पालघर यांचेकडे प्राप्त झालेले नाही. तथापि, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, पालघर यांच्याकडून प्राप्त दिनांक २५/०२/२०२२ च्या पत्रानुसार जिल्हा परिषद, पालघर यांनी पालघर

ता.प्र.क्र.१२५२१.....
श्री.अब्दुल सत्तार....
जिल्ह्यातील शाळांना डिजीटल क्लासरुम उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २८/०२/२०२२ च्या पत्रान्वये प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर केला आहे.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ई-लर्निग करीता सन २०१५-१६ मध्ये १४० शाळांना मल्टीमिडिया इंट्राॲक्टीव सिस्टीम सुविधा, सन २०१८-१९ मध्ये ई-लर्निंग करीता ८४ शाळांना, सन २०१९-२० मध्ये ई-लर्निंग करीता ७३ शाळांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच सन २०१९-२० मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत ११६ शाळांना सौरऊर्जा विद्युतीकरण (सोलर) सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी दिनांक ०५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदेतील सर्व शाळांना ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. जिल्हा नियोजन समितीकडून मला काल पत्र आले. मी केलेली मागणी मार्गी लागण्यास तब्बल एक वर्ष लागले. कोविड काळात विद्यार्थी ऑनलाईनच्या माध्यमातून घरी शिकत होते. त्यावेळी खऱ्या अर्थाने संगणकांची गरज होती. परंतु त्या वेळी संगणक उपलब्ध झाले नाहीत. उशिरा का होईना ते मिळाल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. पालघर जिल्ह्यासाठी ज्याप्रकारे ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली तशाच प्रकारची सुविधा इतर जिल्ह्यांना विशेषत: रायगड, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग, सिंधुदुर्ग अशा अनेक भागात ही सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत सरकारने विचार करावा. कारण या भागांमध्ये आई-वडिलांची मुलांना स्मार्ट फोन घेऊन देण्याची परिस्थिती नाही. मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, मंत्री महोदय, ई-लर्निंगसाठी या विद्यार्थ्यांना संगणक उपलब्ध करुन देणार काय ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, पालघर जिल्ह्यामध्ये ई-लर्निंगची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत जशी मागणी करण्यात आली तशी मागणी आदिवासी विकास विभाग किंवा त्या भागातील लोकप्रतिनिधींकडून आल्यानंतर सजेशन फॉर ॲक्शन.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५२१.....

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, एखाद्या लोकप्रतिनिधीने आपल्या मतदारसंघात विकास कामे करण्याची मागणी केल्यानंतर राज्य सरकार त्याकडे कशाप्रकारे दुर्लक्ष करते याचे हे उत्तम उदाहरण आहे. माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यास दिरंगाई करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येईल, सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या ई-लर्निंग तसेच स्पर्धा परीक्षांसाठी ऑनलाईन मार्गदर्शनाचा प्रस्ताव तत्काळ मंजूर करण्याबाबतचा आदेश देणार काय ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्ताव आता मंजूर झाला आहे. परंतु प्रस्ताव उशिराने सादर केल्यामुळे हा विलंब झाला. सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने पालकमंत्री महोदयांनी डीपीसी बैठकीत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. परंतु तो प्रस्ताव उशिराने सादर केल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यास विलंब झाला. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, विलंबाबाबत निश्चित चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न पालघर जिल्ह्यात ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा असला तरी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये या सर्व सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या असतील तर त्या ठिकाणी कायमस्वरुपी विजेचे कनेक्शन असणे गरजेचे आहे. आज राज्याची परिस्थिती अशी आहे की, सर्व जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या थकीत वीज देयकांमुळे त्यांचे विजेचे कनेक्शन कट करणे सुरु आहे. एका बाजूला ई-लर्निंग सुविधा देत असताना दुसऱ्या बाजूला त्या शाळांमध्ये वीज नाही. शासनाकडून सांगितले जाते की, जिल्हा परिषदेच्या सादिल अनुदानातून वीज देयकाचा खर्च भागवावा. मी निदर्शनास आणून देतो की, शाळांना सादिल अनुदान सुद्धा देण्यात येत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांपैकी ७० टक्के शाळांचे थकीत वीज देयकामुळे वीज कनेक्शन कट करण्यात आलेले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, तत्काळ या शाळांच्या विजेचे कनेक्शन जोडून त्यांना विजेची कायमस्वरुपी व्यवस्था करुन देणार काय ?

ता.प्र.क्र.१२५२१.....

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्या शाळांचे वीज कनेक्शन कट करण्यात आले त्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिले होते. त्या बैठकीला माननीय उप मुख्यमंत्री सुद्धा उपस्थित होते. मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, ग्राम विकास विभागाने विजेचे कनेक्शन सुरु करण्यासाठी काही निधी उपलब्ध करुन द्यावा. त्यानुसार ग्राम विकास विभागाकडून काही निधी देऊन विजेचे कनेक्शन सुरु करण्याचा निर्णय लवकरात लवकर घेण्यात येईल.

श्री.शशिकांत शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने एवढेच विचारु इच्छितो की, आपण शाळांना या विषयी १ हजार रुपये खर्च परवानगी दिलेली आहे. तसेच जिल्हा परिषदांच्या अनेक शाळांचे वीज देयकाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कट करण्यात आलेले आहे. सध्या शाळांना कमर्शियल रेटने वीज देयक आकारले जाते. शाळांना कमर्शियल रेट न आकारता इंडस्ट्रीयल रेट किंवा कमी दराने वीज देयक आकारण्याबाबतचा निर्णय या सभागृहात झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणी मंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन शाळांना कमर्शियल ऐवजी इंडस्ट्रीयल किंवा कमी दराने वीज आकारण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या अनुषंगाने माननीय ऊर्जा मंत्री डॉ.नितीन राऊत यांच्या समवेत बैठक झालेली आहे. त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, सभागृहामध्ये शाळांना कमर्शियल रेट ऐवजी कमी दराने वीज आकारण्याबाबत आश्वासन देण्यात आलेले आहे. यास ऊर्जा विभागाने लवकरात लवकर मान्यता दिली तर वीज आकारणीच्या दरातील फरक दूर होईल. आम्ही तर इंडस्ट्रीयल ऐवजी घरगुती विजेचा दर आकारण्याबाबत विनंती केलेली आहे.

---------

**मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात उपचारासाठी औषधे व वैद्यकीय साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२) * ११७८३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयांना हाफकीन बायोफार्माकडून औषधे पुरविली जात असून, सन २०२०-२१ मध्ये नोंदणी केलेल्या औषधांपैकी केवळ ३० टक्केच औषधे प्राप्त झाली असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयात औषधांचा व वैद्यकीय सामुग्रीचा तुटवडा निर्माण झाला असून कोरोना प्रादुर्भावासह ताप, सर्दी, खोकला व अंगदुखी ही लक्षणे असणाऱ्या रुग्णांसाठी पॅरासिटामॉलसारख्या गोळया उपलब्ध नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयांमध्ये एन्ट्रानिल सायट्रेट हे वेदनाशमक इंजेक्शन, ॲमोक्सिन क्लॅव्ह इंजेक्शन, सर्पदंशासाठीचे ॲण्टी स्नेक व्हेनम, हिपॅटायटीस बी इम्युनोग्लोबिन, स्टराइल वॉटर व कोरोना रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी लागणारी काही औषधे उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हाफकीन बायोफार्माकडे पाठपुरावा करूनही सद्य:स्थितीत आवश्यक असलेली ३३ औषधे उपलब्ध झालेली नसून राज्यातील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये औषधांच्या तुटवड्यामुळे कोरोना रुग्णांसाठी तसेच इतर आजाराच्या रुग्णांना लागणारी औषधे रुग्णालयात उपलब्ध नसल्याने रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

ता.प्र.क्र.११७८३....

(५) तसेच, मुंबईतील सर जे. जे. रुग्णालयामध्ये व्हेंटिलेटरची अपुरी उपलब्धता असून, त्यापैकी अनेक संच नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले असून ओमायक्रॉन विषाणू संसर्गाचा वाढता प्रादुर्भाव पाहता व्हेंटिलेटर्स नादुरुस्त असण्यामागची कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना रुग्णांवरील वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक असलेली औषधे, वैद्यकीय साधनसामुग्री तसेच, व्हेंटिलेटर उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) नाही.
(५) व (६) एकूण ११० व्हेटिंलेटर्स पैकी ९८ कार्यरत असून १२ नादुरुस्त असलेले व्हेटिंलेटर्स दुरुस्त करून घेण्याची कार्यवाही संस्थास्तरावर सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.मनिषा कायंदे : सभापती महोदय, रुग्णालयांतील व्हेंटीलेटर्स बंद असणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. जे.जे. रुग्णालयातील १३४ पैकी ३७ व्हेंटीलेटर्स नादुरुस्त आहेत, सेंट जॉर्जेस समूह रुग्णालयातील १०७ पैकी ९ नादुरुस्त आहेत, जी.टी. रुग्णालयातील ५७ पैकी ६ नादुरुस्त आहेत, कामा रुग्णालयातील ६ व्हेंटीलेटर्स नादुरुस्त आहेत. या रुग्णालयातील सर्व व्हेंटीलेटर्स १० वर्षांपेक्षा जुनी झालेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे दर चार वर्षांनी व्हेंटीलेटरचे सॉफ्टवेअर अपग्रेड करावे लागते. जे.जे. रुग्णालयात आरोग्य व्यवस्थेचा मोठ्या प्रमाणावर ताण आहे. या रुग्णालयात २२५ व्हेंटीलेटर्सची आवश्यकता आहे. मी स्पेसिफिक विचारु इच्छिते की, या रुग्णालयातील व्हेंटीलेटरचे सॉफ्टवेअर दर चार वर्षांनी अपडेट करण्यात

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७८३....

डॉ.मनिषा कायंदे....

येतात काय, वेगवेगळ्या कंपनीचे व्हेंटीलेटर्स दुरुस्त करताना अडचणी येत असल्यामुळे या बाबतीत विभागाचे काय नियोजन आहे, तसेच व्हेंटीलेटर्स चालविण्यासाठी जे प्रशिक्षण द्यावे लागते ते देण्यात येते काय ?

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी जे.जे.रुग्णालयात अनेक व्हेंटीलेटर्स नादुरुस्त असल्याचे सांगितले. मी त्यांना सांगू इच्छितो की, तेथील व्हेंटीलेटर्स नादुरुस्त नसून ते अंडर मेंटेनन्स आहेत. रुग्णालयात जेवढे व्हेंटीलेटर्स असतात त्या संख्येच्या तुलनेत जेवढे अंडर मेंटेनन्स ठेवायचे असतात तेवढेच व्हेंटीलेटर्स सर्व रुग्णालयांमध्ये अंडर मेंटेनन्समध्ये आहेत. कोणत्याही ठिकाणी व्हेंटीलेटर्सची कमतरता नाही. ज्या ठिकाणी रुग्णालयाचा विस्तार झालेला आहे, अति दक्षता विभागाचा विस्तार झालेला आहे किंवा कोरोनामुळे ज्या ठिकाणी या सर्व व्यवस्थांचा विस्तार करावा लागला त्या ठिकाणी कोरोना काळात व्हेंटीलेटर्स खरेदी करुन तेथे उपलब्ध करुन देण्याची अंमलबजावणी आमच्या विभागाने केलेली आहे.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना कल्पना आहे की, केंद्र सरकारने सुद्धा अनेक व्हेंटीलेटर्स राज्यांना पाठविलेले आहेत. त्या व्हेंटीलेटर्सपैकी अनेक व्हेंटीलेटर्स राज्यातील अनेक रुग्णालयात बसवून ते सुरु केलेले आहेत. तसचे सीएसआर अंतर्गत आणि काही दानशूर संस्थांनी कोरोना आपत्तीच्या काळात काही व्हेंटीलेटर्स दिलेले आहेत. वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत जेवढे रुग्णालय या राज्यात कार्यरत आहेत त्या ठिकाणी व्हेंटीलेटर्सची व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे यांनी सांगितल्यानुसार व्हेंटीलेटर्सचे सॉफ्टवेअर काही कालांतराने आऊटडेटेड होता. व्हेंटीलेटर्सचा पुरवठा करणाऱ्या कंपनीबरोबर ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट केलेला आहे. त्यांचा करार संपुष्टात आल्यास किंवा एखादे व्हेंटीलेटर खराब झाले तर ते बदलावे लागते. ती प्रक्रिया सुद्धा नियमितपणे पार पाडण्यात येते. तसेच व्हेंटीलेटर हाताळण्यासाठी जे टेक्निशीयन लागतात त्यांचे प्रशिक्षण केवळ वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयातच देण्यात येत नसून, अनेक कॉर्पोरेट संस्थांमध्ये सुद्धा

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.अमित देशमुख....

देण्यात येते. पुणे येथील उद्योजक श्री.फिरोदीया यांनी त्यांच्या कारखान्यात व्हेंटीलेटर्स तयार केलेले आहेत. त्या ठिकाणी प्रशिक्षण देण्यासाठी देखील त्यांनी राज्य सरकारला आवाहन केले होते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख ....

राज्यभरातील वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य या विभागांच्या रुग्णालयांच्या, महानगरपालिकांतर्गत रुग्णालयांच्या अनेक टेक्निशिअनना देखील कॉर्पोरेट सेक्टरमधून वेळावेळी तज्ज्ञ प्रशिक्षण देण्यात आले आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, आता व्हेंटिलेटरबाबत सांगण्यात आले. परिस्थिती वेगळी आहे. मी आजच सकाळी माहिती घेतली आहे. एमआरआयच्या रुग्णाला २ महिन्यांचे वेटिंग आहे. ताण आहे हे मान्य आहे. आपली आरोग्य व्यवस्था प्रायमरी, सेकंडरी व टर्शरी आहे. पीएचसीपासून अपेक्स टर्शरी सेंटर जे.जे.हॉस्पिटल आहे. माझ्याकडे आजच एका रुग्णाला दिलेले प्रिस्क्रिप्शन आहे. यामध्ये काही औषधे लिहिलेली आहेत. व्हेंटिलेटर ही दूरची गोष्ट आहे. प्रिस्क्रिप्शनवर तारीख असून ते मी तुम्हाला देतो. त्यामध्ये उपलब्ध नसलेल्या औषधांची गिणती मी देतो. रुग्णाला पाच औषधे लिहून दिली आहेत. पहिले औषध Ascorbic Acid आहे, जी ३० पैशांना गोळी मिळते, उपलब्ध नाही. Calcium Carbonate गोळी नसल्यामुळे त्यावर फुली मारली आहे. Calcium Carbonate गोळी उपलब्ध नाही, ती गोळी ७० पैशांना मिळते. Polyvitamin tablet उपलब्ध नाही. Diclofenac Sodium ही गोळी पेनकिलर आहे, ती देखील आज जे.जे.हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नाही. आता यापेक्षा अजून काय पाहिजे ? माझ्या हातामध्ये प्रिस्क्रिप्शन आहे. ५ गोळ्यांपैकी १ गोळी उपलब्ध आहे आणि ती म्हणजे Pantoprazole आहे. आपल्या अपेक्स सेंटरची अशी परिस्थिती असेल तर आता याचे काय करावे असे मला वाटते. माझी विनंती आहे. जे.जे.हॉस्पिटलसारख्या ठिकाणी किमान ओपीडीच्या मेडिसिन टॅब्लेट तरी सस्टेनेबल रहाव्यात ही आपल्याकडून अपेक्षा आहे.

श्री. अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ते प्रिस्क्रिप्शन आपल्याकडे सुपूर्द करणार आहेत, ते आपल्याकडून आमच्याकडे आपण द्यावे ही

श्री. अमित देशमुख ....

विनंती आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. हे आजचे प्रिस्क्रिप्शन असेल आणि प्रिस्क्रिप्शन ज्या डॉक्टरांनी दिले असेल त्यांना आजच निलंबित करण्यात येईल असे मी येथे जाहीर करतो.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ऑब्जेक्शन आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : आपण ऐकून घ्यावे. आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकून घ्यावे. नवीन पध्दत पडू लागली आहे. माझी सदनाला विनंती आहे की, माननीय मंत्र्यांना उत्तर देऊ द्यावे. तुम्हाला नंतर म्हणणे मांडण्यास संधी आहे. तुम्ही असे म्हणू नये.

श्री. अमित देशमुख : सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांनी गंभीर बाब सभागृहासमोर मांडली आहे. सरकार त्याच्याशी सहमत आहे. आज हे प्रिस्क्रिप्शन त्यांनी दिले असेल तर ते आणि सन्माननीय सदस्यांनी प्रिस्क्रिप्शन दाखवून मुद्दे मांडले आहेत ते अतिशय गंभीर आहेत. ३० पैसे, ७० पैसे किंमत असणाऱ्या गोळ्या ओपीडीमध्ये उपलब्ध नसतील तर त्याला कोणाला तरी जबाबदार ठरवावे लागेल. आपला रोख असा होता की, राज्य सरकारकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, हाफकिन महामंडळाकडे या खरेदीचा निर्णय झाला, हा आपल्या सरकारमध्ये सन २०१७ मध्ये करण्यात आला. आपण केला म्हणजे तो आपण काही करण्यासाठी केला असे माझे म्हणणे नाही. न्यायालयामध्ये काही प्रकरणे गेली आणि न्यायालयाने सरकारला काही निर्देश दिले, मग सरकारने पर्यायी व्यवस्था त्यावेळी उभी केली. ९० टक्के निधी हाफकिनला वर्ग केला जातो. १० टक्के निधी अधिष्ठातांच्या अखत्यारित दिलेला आहे. १० टक्के निधीमध्ये ओपीडीमध्ये आवश्यक असणारी औषधे खरेदी करता येतात याबाबत कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. आपण आज प्रिस्क्रिप्शन दिले आहे, त्यावर आम्ही कार्यवाही करु.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी तात्काळ या विषयाची दखल घेतली आहे त्याबाबत मी माननीय मंत्र्यांचे आभार व्यक्त करतो. आपण ३० पैसे, ७० पैसे अशा किंमतीना असणाऱ्या गोळया उपलब्ध करु शकत नाही. तुम्ही प्रिस्क्रिप्शन देणाऱ्या डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई करुन चालणार नाही. त्यांनी प्रिस्क्रिप्शन दिले ही चूक झाली का ? तेथे साठा असणे किंवा नसणे ही बाब आहे. संबंधित अधिकारी, स्टोरेज, पर्चेस डिपार्टमेंट आहे आणि त्यात पुरवठादार आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते, मी आपल्याला एकप्रकारे मदत करीत आहे. ज्या डॉक्टरांनी हे प्रिस्क्रिप्शन दिले आहे, त्यांना निलंबित करण्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. मी सदनाला वारंवार सांगतो की, कोणाचेही निलंबन टिकवायचे असेल तर अगोदर चौकशी करुन त्यानंतर निलंबन करणे योग्य आहे. पण ठीक आहे. माननीय मंत्र्यांनी तो धोका पत्करलेला आहे. निलंबनाच्या वेळी जी चौकशी होईल, त्यांचे पुरवठादार आणि कनिष्ठ विभाग जबाबदार असतील तर त्याचा उल्लेख होईल आणि त्यानंतर निर्णय होईल. आपल्याला त्याला तर डिसमिस करावे लागेल.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझी विनंती आहे. डॉक्टरांचा दोष काय आहे, ? त्यांनी फक्त प्रिस्क्रिप्शन दिले. ॲक्शन योग्य माणसावर झाली पाहिजे. डॉक्टरांची काय चूक आहे, त्यांनी अमुक गोळी पाहिजे, तमुक गोळी पाहिजे हे सांगितले आहे. वड्याचे तेल वांग्यावर काढत आहात काय ? आपल्याला निलंबित करायचे असेल तर संबंधित यंत्रणेतील जे अधिकारी दोषी असतील त्यांना करावे. तुम्ही लगेच डॉक्टरांना निलंबित करुन चालणार नाही. त्यांनी प्रिस्क्रिप्शन दिले आहे.

**सभापती** : आधी चौकशी करु आणि नंतर निलंबन करु.

श्री. प्रवीण दरेकर : सभापती महोदय, २ वर्षांचा कालावधी झाला आहे. जे.जे.हॉस्पिटल महाराष्ट्रातील सर्वसामान्यांचे प्रमुख हॉस्पिटल आहे. आपण त्याला किती निधी उपलब्ध केला आणि किती निधी वितरित झाला हे सांगावे.

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख : सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयच नव्हे तर सर्व औषधांसाठी दरवर्षी जवळपास साडे चारशे कोटी रुपये निधी आवश्यक असतो. साधारणत: मागणी येते तसा निधी वितरित केला जातो. मी मघाशी म्हणालो की, ९० टक्के निधी हाफकिनला मागणी आल्याबरोबरच वर्ग करतो, जेणेकरुन त्यांना सर्व खरेदी करता येईल. अधिष्टाता स्तरावर १० टक्के निधी खर्च करण्याचे अधिकार होते, ते आता ३० टक्क्यापर्यंत वाढविले आहेत. कारण या सर्व तक्रारी अनेक वेळा येत होत्या. हाफकिनचा देखील विलंबाचा मुद्दा आहे. इंजेक्शन व औषध यांच्या एखाद्या टेंडरच्या कंडिशन्स परिपूर्ण झाल्या नाहीत तर ते पुन्हा रिटेंडर करावे लागते, अशा अडचणी आल्या आहेत. त्यामध्ये आणखी सुलभता कशी करता येईल याबाबत देखील आपण विभागाच्या वतीने पाहू. माझ्याकडे आता जे.जे.रुग्णालयाच्या मागणीचा आकडा उपलब्ध नाही. सन २०२०-२१ मध्ये जे.जे.रुग्णालयाकरिता १९८ बाबी मागणी केल्या होत्या, त्यापैकी १३१ बाबी मंजूर केल्या आहेत. माझ्याकडे जे.जे. रुग्णालयासंदर्भात आताच माहिती आली आहे की, २४ कोटी रुपये निधी दिला आहे. त्यांनी तेवढीच मागणी नोंदविली आणि जेवढी मागणी नोंदविली तेवढी मंजूर केली आहे, त्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही.

श्री. अनिकेत तटकरे : सभापती महोदय, जे.जे.हॉस्पिटलची स्थापना सन १८४५ मध्ये झाली आहे. हे जुने हॉस्पिटल आहे. त्यावर मोठ्या प्रमाणात ताण आहे. शासनाला विनंती आहे की, हे फक्त मुंबईपुरते मर्यादित न राहता त्याची उप शाखा किंवा नवीन रुग्णालय नवी मुंबई किंवा रायगडमध्ये सिडकोकडून जागा घेऊन स्थापन करणार का ? तसेच तेथील डीन डॉक्टर पल्लवी सापळे यांनी गेल्या २ वर्षांमध्ये कोविडमध्ये चांगले काम केले आहे. माझ्या माहितीप्रमाणे आज त्या तेथे नसून त्यांची इतर ठिकाणी नेमणूक करण्यात आली आहे. खरे असेल तर त्यांना पुनश्च: तेथे पदावर पुनर्स्थापित करणार का ?

श्री. अमित देशमुख : सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयाची एखादी शाखा मुंबई बाहेर सुरु करता येते का असे म्हणणे आहे. एक चांगली सूचना आहे. आम्ही

असुधारित प्रत

श्री. अमित देशमुख ....

त्याबाबत विभागामध्ये निश्चित चर्चा करु. समजा ते शक्य असेल तर तशी योजना आपल्याला आणता येईल. डॉक्टर पल्लवी सापळे यांच्याबातत मुद्दा उपस्थित केला. शासनाकडून विभागाला निर्देश देऊ की, त्यांच्या मागण्या आहेत त्यावर लवकरात लवकर निर्णय करावा.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी चांगले उत्तर दिले आहे. आपण डॉक्टरांच्या निलंबनाची आता घोषणा करु नये. प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये पॅथोलॉजी लॅबोरेटरी असते. माझ्या माहितीप्रमाणे ते बाहेर टेस्ट करण्यासाठी चिठ्ठ्या देतात. पॅथोलॉजीचे सर्व एजंट बाहेर फिरत असतात.

नंतर श्री. खर्चे ....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.सतीश चव्हाण....

पॅथॉलॉजीमधील बऱ्याच टेस्ट मेडिकल कॉलेजमध्ये होत नाहीत, अशा चिठ्ठ्या आज तुम्हाला सन्माननीय सदस्यांनी दाखविल्या. आम्ही तुम्हाला प्रत्येक मेडिकल कॉलेजमधील अशा चिठ्ठ्या दररोज दाखवू शकतो. त्यासाठी आपण किती डॉक्टरांना निलंबित करणार आहात ? या विषयाच्या मुळाशी गेले पाहिजे. हाफकीन इन्स्टिट्यूटमध्ये घोटाळा झाला असे मी म्हणणार नाही, तीन तीन वर्षे त्यांच्याकडे पैसे देण्यात येतात व औषधी मिळत नाहीत, उपकरणे मिळत नाहीत, डीपीसीतून निधी देऊन चार वर्षे झाली तरी साहित्य खरेदी करण्यात आले नाही. मेडीकल कॉलेजसाठी तरी काही वेगळी व्यवस्था करण्यात यावी. कोणत्या ठिकाणावरुन ही बाब बाहेर आली याची मला माहिती नाही. परंतु वैद्यकीय शिक्षण विभागाने यासाठी स्वत:ची कार्यक्षम यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. तशी यंत्रणा त्वरीत करण्यात येईल काय ? औरंगाबाद येथील मी उदाहरण देतो, डीपीसीमधून औरंगाबाद येथील मेडिकल कॉलेजसाठी भरपूर पैसा देण्यात आला असून मागील चार वर्षात त्यातील १० टक्के निधी हाफकीन इन्स्टिट्यूटने उपकरणे घेण्यासाठी खर्च केलेला नाही. सदर निधी हाफकिन इन्स्टिट्यूटकडे जमा आहे. यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण करण्याची घोषणा मंत्री महोदय आज करतील काय ?

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दा उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी जे.जे.रुग्णालयातील प्रिस्क्रीप्शन सभागृहात दाखविले आहे. प्रिस्क्रीप्शन देणारे डॉक्टर आहेत त्यामुळे निलंबनाची कारवाई कोणावर करावी. कारण ओपीडीमध्ये काम करणारे, औषधी आहे किंवा नाही हे पाहणारे सर्व डॉक्टर आहेत. त्यामुळे मी डॉक्टरांचे निलंबन असे म्हणालो होतो. नेमका हा दोष कोणाचा आहे तो निश्चित करुन त्यावर कारवाई केली जाईल. हाफकीन इन्स्टिट्यूट संदर्भात जे मुद्दे उपस्थित करण्यात आले ती वस्तुस्थिती आहे ते मी नाकारीत नाही. त्याच बरोबर आपणाला मी हेही सांगू इच्छितो की, हाफकीन इन्स्टिट्यूटने आजपर्यंत एकूण ४५६३ निविदा प्रसिध्द

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.अमित देशमुख....

केल्या. जवळपास २९६७ कोटी रुपये पुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केले. कोविड-१९ उपाययोजनेअंतर्गत औषधी, यंत्रसामुग्री व इतर बाबी खरेदी करण्याकरिता जवळपास ८५४ कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली. त्यातून बाजारमुल्यांप्रमाणे ५६६ कोटी रुपये शासकीय निधीची बचत केली आहे. हे मला मुद्दाम येथे सांगितले पाहिजे. तसेच नॉन कोव्हीड व दैनंदिन आवश्यकतेची औषधी, उपकरणे, यंत्रसामुग्री व अन्य बाबींसाठी २०९७ कोटी रुपयांची खरेदी हाफकीन इन्स्टिट्यूटकडून करण्यात आली असून बाजार मुल्यांप्रमाणे जवळपास ४०३ कोटी रुपये शासकीय निधीची बचत केली आहे. अशा प्रकारे हाफकीन इन्स्टिट्यूटने खरेदी प्रकियेत जवळपास १००० कोटी रुपये शासकीय निधीची बचत केली आहे. सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत त्यामध्ये दिरंगाई होते, वेळेवर औषधी किंवा उपकरणे मिळत नाहीत हे सत्य आहे. ही कार्यवाही जलदगतीने कशी करता येईल यासाठी कालमर्यादा निश्चित करुन त्यांना ही कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येतील. तसे झाले नाही तर संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रसाद लाड : सभापती महोदय, या विषयाला अनुसरुन माझे तीन प्रश्न आहेत. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षी जे.जे. हॉस्पीटलने १५० कोटी रुपयांची मागणी केली होती. आता मंत्री महोदयांनी असे सांगितले की, २४ कोटी रुपयांचा निधी त्यांना देण्यात आला आहे. मंत्री महोदयांनी अतिशय चांगली व समाधानकारक उत्तरे दिली आहेत. जे.जे.हॉस्पीटलने निधी मागितला नाही असे आपण सांगितले. यासाठी मंत्रालय व प्रशासनाची काही जबाबदारी नाही काय ? राज्यातील सर्वात मोठे हे हॉस्पीटल आहे. त्यांची मागणी काय आहे त्यांना काय लागणार आहे, याबाबत आढावा वैद्यकीय शिक्षण विभागाने घ्यावा अशी माझी मागणी आहे व तसे करण्यात येईल काय ? जे.जे.हॉस्पीटलने १५० कोटी रुपयांची मागणी केली होती ही माझी माहिती आहे त्याबाबत खातरजमा करण्यात येईल काय ? हाफकिन

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.प्रसाद लाड....

इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून ही सर्व खरेदी केली जाते. हॉफकीन इन्स्टिट्यूट अतिशय मोठी आहे. मागील दीड ते दोन वर्षापासून माझ्या माहिती प्रमाणे संचालक व उप संचालकाचे पद रिक्त आहे. ते भरण्यात आले आहे काय, रिक्त असेल तर ते कधी भरण्यात येईल.

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यामध्ये त्यांच्या माहितीनुसार जे.जे.रुग्णालयाची १५० कोटी रुपयांची मागणी आहे. हा प्रश्न मुख्य जे.जे.रुग्णालया संदर्भात होता. जे.जे.रुग्णालय समूहामध्ये तीन रुग्णालये आहेत. त्या सर्व रुग्णालयांची मागणी १२५ कोटी रुपये असेल. याबाबत दुमत असण्याचे काही कारण नाही. नेमकी या रुग्णालयांची मागणी काय आहे, त्यांना काय आवश्यकता आहे, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेनुसार विभागाला तसे निर्देश देण्यात येतील. आता मार्च अखेर आहे, एप्रिल पासून नवीन आर्थिक वर्षे सुरु होते. या सर्व मागण्या त्यांनी मार्चअखेर विभागाकडे नोंदवाव्यात. जेणेकरुन पुढील वर्षात ही सर्व कार्यवाही करण्यास आम्हाला मदत होईल. जे.जे.रुग्णालयात बायोमार्फा कंपनी आहे, त्यांचे एम.डी. हे पद भरण्यात आले आहे. हे पद कधीही रिक्त नव्हते. एम.डी. खरेदी कक्षाचे प्रमुख आहेत. हाफकीन इन्स्टिट्यूटचे संचालक व उप संचालक यांची पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग, सेवा प्रवेश भरती नियम याबाबत महाविकास आघाडी शासन असताना तसेच युतीचे शासन असताना तेथे आयएएस अधिकारी नियुक्त केला आहे. सेवा प्रवेश भरती नियमासंदर्भातील सर्व तपशील शासनाने लोकसेवा आयोगाकडे दिला आहे. लोकसेवा आयोगाच्या सूचनेनुसार जाहिरातीद्वारे संचालकांचे पद भरावे लागेल ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझा प्रश्न थोडा स्कोपच्या बाहेरचा आहे, जे.जे.रुग्णालयातील अस्थायी सहाय्यक प्राध्यापकांच्या सेवा नियमित करण्यासाठी त्यांनी संप सुरु केला आहे. त्याबाबत आपण आश्वासन दिले होते. मी तेथे मी जाऊन आलो व आपणाशी बोललो होतो. मंत्री महोदयांना माझी विनंती आहे

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.प्रवीण दरेकर....

की, कोविड काळात त्यांनी चांगली सेवा दिलेली आहे. दीड महिन्यापासून ते उपोषणाला बसले आहेत. त्याबाबत दखल घेऊन मार्ग काढण्यात यावा. हा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात येऊ नये. याबाबत योग्य ती दखल घेऊन कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये काही प्राध्यापक आहेत, काल याबाबत सभागृहात चर्चा झाली. त्यांच्या अनेक मागण्या आहेत. त्यापैकी ८० टक्के मागण्या राज्य सरकार व वैद्यकीय शिक्षण विभागाने मान्य केल्या आहेत. दोन मागण्या राहिल्या त्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाने शिफारशींसह सामान्य प्रशासन विभाग, अर्थ व नियोजन विभागाला पत्र व्यवहार केला आहे. आम्हाला असे कळते की, भरतीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णय दिल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत. यासंदर्भात अधिवेशन काळात बैठक घेणे शक्य असेल तर तशी बैठक घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दिल्ली शासनाने आरोग्य व शिक्षण व्यवस्था सुधारली असून ती नाविन्यपूर्ण आहे. त्याबाबत अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाचे अधिकारी जातील काय ? मंत्री महोदय आपण तरुण व तडफदार आहात, आपण स्वत: तेथे जाऊन बघावे. दिल्ली शहरातील लोक खाजगी रुग्णालयात जाण्यापेक्षा सरकारी रुग्णालयात जास्त प्रमाणात उपचार घेण्यासाठी जातात. याबाबत राज्य शासनाकडून अभ्यास करण्यात येईल काय ?

**सभापती** : राज्य शासन निश्चितपणे याचा अभ्यास करेल. मंत्री महोदय आपण जी बैठक घेणार आहात त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जी सूचना केली त्याचा विचार करावा.

ता.प्र.क्र.११७८३....

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय महत्वाचा आहे. दिल्ली सरकार एकूण अर्थसंकल्पाच्या १२ टक्के रक्कम आरोग्य विभागावर खर्च करते. महाविकास आघाडी शासनाने आरोग्य व वैद्यकीय शिक्षण विभागांना कोरोना काळात आर्थिक तरतूद जास्त देण्याचे तत्वत: मान्य केले होते.

या नंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.११७८३......

श्री.अमित देशमुख......

आपण त्या संदर्भात पावले उचचलेली आहेत. येणाऱ्या काळात या विभागासाठी अधिकची आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली तर आपल्याला या सर्व व्यवस्था निर्माण करता येतील. सदर विषय माननीय आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांच्याकडे आहे. मी त्यांना आपला निरोप देतो.

----------

असुधारित प्रत

## पेठ (जि.नाशिक) तालुक्यातील मृद व जलसंधारणाच्या विविध योजनांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) * १२८२९ श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दटके, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या कृषी विभागामार्फत विविध योजना राबवित असताना सन २०११ ते २०१७ या कालावधीमध्ये पेठ (जि.नाशिक) कृषी विभागाच्या १६ अधिकाऱ्यांनी शासनाच्या रुपये ५० कोटी ७२ लाख ६४ एवढया निधीमध्ये गैरव्यवहार केल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेठ तालुक्यात शासनाच्या विविध योजना मंजूर करुन, त्यांच्या बोगस निविदा काढून सुमारे १४७ शेतकऱ्यांची कृषी अधिकाऱ्यांनी फसवणूक केली आहे, तसेच उपरोक्त कालावधीमध्ये पेठ कृषी विभागांतर्गत मंजूर असलेली कामे न करता, लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे कामे पूर्ण झाल्याचे दाखवून गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कामाची देयके मंजूर करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ८ जानेवारी, २०२२ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.

तालुका कृषी अधिकारी, पेठ कार्यालयांतर्गत सन २०११-१७ या कालावधीत गतिमान पाणलोट योजनेंतर्गत रुपये ७,२५,६४,०००/- आणि एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत रक्कम रुपये १२,७३,९३,०००/- अशी एकूण रक्कम रुपये १९,९९,५७,०००/- खर्च झालेली आहे. त्यामुळे, शासनाचे रुपये ५० कोटी ७२ लाख ६४ रुपयाचा गैरव्यवहार केला असल्याचे म्हणणे संयुक्तिक नाही.

ता.प्र.क्र.१२८२९........

श्री.शंकरराव गडाख.......

(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्या आदेशानुसार त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ न्यायालय, पेठ, जि.नाशिक यांच्या आदेशानुसार मूळ तक्रारीत उल्लेख केलेल्या १६ कृषी अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरूध्द पोलीस स्टेशन, पेठ येथे गुन्हा दाखल करून त्यापैकी ०३ अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरूध्द अटकेची कार्यवाही करण्यात आली होती. त्याअनुषंगाने, कृषी पर्यवेक्षक, करंजाळी यांना विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक कार्यालयाने दिनांक ०७/०१/२०२२ पासून मानीव निलंबीत केले आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.रमेश कराड : सभापती महोदय, मूळ तक्रारीत १६ कृषी अधिकाऱ्यांना दोषी ठरवून पोलिसांमध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती. ३ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. उर्वरित दोषी आरोपींवर निलंबनाची वा तत्सम प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे काय आणि त्याचा निश्चित कालावधी जाहीर करण्यात येणार आहे काय ?

श्री.शंकरराव गडाख : सभापती महोदय, पेठ तालुक्यात सन २०११ ते २०१७ या कालावधीत गतीमान पाणलोट योजनेबाबत तक्रारदाराने तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार केली होती. तक्रारदाराने ट्रॅक्टरधारक म्हणून १६ गावांमध्ये केलेल्या पाणलोट कामांचा मोबदला मिळाला नसल्यामुळे तक्रार केली होती. सदर तक्रार मुख्यमंत्री महोदयांकडून कनिष्ठ स्तरावर पाठविण्यात आली. उप विभागीय कृषी अधिकाऱ्यांच्या वतीने त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीमध्ये तत्कालीन कृषी उप महासंचालक, तत्कालीन प्रकल्प व्यवस्थापक

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२८२९........

श्री.शंकरराव गडाख......

आणि तालुका कृषी अधिकारी यांचा समावेश होता. त्रिसदस्यीय समितीने संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन अहवाल सादर केला. सदर अहवालात ट्रॅक्टरचे पेमेंट चेकद्वारे दिल्याचे नमूद केलेले आहे. श्री.योगेश सापटे नावाच्या शेतकऱ्याने तक्रार केली होती. तक्रारदाराकडे विचारणा केल्यानंतर त्यांनी माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही, धनादेशाद्वारे पेमेंट देण्यात आलेले असल्यामुळे मी माझी तक्रार मागे घेत असल्याचे लेखी दिलेले आहे. तो अहवाल एसओ यांच्याकडे पाठविण्यात आला. एसओ यांनी तो जीडीए यांच्याकडे पाठविला. त्यानंतर आयुक्तांनी अहवालाच्या आधारे प्रकरण निकाली काढले. परंतु प्रकरण निकाली काढल्यानंतर तक्रारदाराने त्याच वेळी म्हणजे लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्तांकडे देखील तक्रार दाखल केली होती. सदर अहवालाच्या आधारे ती तक्रार देखील निकाली काढण्यात आली. परंतु दोन वर्षानंतर तक्रारदाराने कोर्टात अर्ज दाखल केला. कोर्टाने कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे जवळपास १६ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर २-३ लोकांना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडून जामीन देण्यात आला आणि इतर कर्मचाऱ्यांना जिल्हा न्यायालयाकडून अटक पूर्व जामीन मंजूर झालेला आहे. सद्य:स्थितीत हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. आदिवासी उप योजनेंतर्गत मृद संधारणाच्या नाला बंडिंग, ढोळीचे बांधकाम, दगडी बांधकाम, मजगी, समतल चर, खोल सलग समतल चर, मातीचे बांध, नूतनीकरण व जुन्या भात शेतीची दुरुस्ती अशी वेगवेगळी कामे घेण्यात आली होती. कृषी विभागाच्या अधिकाऱ्याने एकाच व्यक्तीच्या कोऱ्या स्टॅम्प पेपरवर, ५० पावत्यांवर सह्या घेऊन तालुक्यातील १० गावांमध्ये योजना राबविण्यात आली होती....

**सभापती** : आपण कृपया स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

ता.प्र.क्र.१२८२९........

श्री.सदाभाऊ खोत : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, आपण चौकशी समिती नियुक्त केली. चौकशी समितीने भ्रष्टाचार झालेला नसल्याचा अहवाल दिला. परंतु सदर प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने संबंधितावर गुन्हे दाखल करण्याचा आदेश दिला. म्हणजे सदर प्रकरणात भ्रष्टाचार झालेला आहे हे स्पष्ट होते. तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात ३ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध होते. मग भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध होत असेल तर केवळ ३ अधिकाऱ्यांवरच निलंबनाची कारवाई का करण्यात आली, इतर अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई का करण्यात आली नाही ? शासन उर्वरित दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, तारांकित प्रश्नाच्या उत्तरात एकात्मिक पाणलोट योजनेचा तपशील व रक्कम नमूद केलेली आहे. मात्र एकापेक्षा जास्त योजनेत भ्रष्टाचार झालेला आहे, हे खरे आहे काय ? सदर प्रकरणी केवळ पाणलोट योजनेची चौकशी झालेली असल्यामुळे चौकशीतून योग्य माहिती मिळालेली नाही, हे खरे आहे काय ? शासन संपूर्ण योजनेची चौकशी करणार आहे काय ? तसेच, तेथे पाणलोट विकासाची कामे अस्तित्वात आहेत किवा नाही हे बघण्यासाठी आमदारांची समिती किंवा प्रश्नकर्त्या सदस्याला कामे दाखविण्यात येणार आहेत काय ?

श्री.शंकरराव गडाख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सदाभाऊ खोत यांनी ५-६ प्रकारच्या कामांची चौकशी करण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. हे खरे आहे की, जो अहवाल प्राप्त झाला त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे तक्रारदाराने तक्रार मागे घेतली, लेखीही लिहून दिले. परंतु त्या अहवालामुळे समाधानी नसल्यामुळे तक्रारदार कोर्टात गेला. कोर्टाने पोलिसांना संपूर्ण चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पोलीस अधीक्षक यांच्याकडे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधितावर तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. त्यानंतर ३ लोकांना अटक करण्यात आली. त्यापैकी एका व्यक्तीला निलंबित करण्यात आले. उर्वरित १२ ते १३ लोकांनी अटक पूर्व जामीन मिळविला. परंतु ज्यावेळी ही कारवाई

श्री.शंकराव गडाख.........

सुरु होती त्याच वेळी साधारणत: ५ तारखेला कोर्टाकडून निर्णय आला आणि ६ तारखेला पोलीस अधीक्षकांनी हे संपूर्ण प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासासाठी वर्ग केले आहे. सध्या तपास सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या ५-७ प्रकारच्या कामांची चौकशी करण्याबाबत उल्लेख केलेला आहे त्या सर्व चौकशा आर्थिक गुन्हे विभागामार्फत करण्यात येतील.

श्री.प्रवीण दरेकर : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे. पहिल्या लेखी प्रश्नाचे उत्तर "अंशत: खरे आहे" असे दिलेले आहे. तक्रारदाराचे समाधान झाले होते तर मग तो कोर्टात का गेला ? तक्रारदारावर दबाव टाकून त्याच्याकडून तसे लिहून घेण्यात आलेले आहे. आपण अधिकाऱ्यांना पाठीशी का घालत आहात ? आपण अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. ज्या माणसाचे समाधान झाले तो कोर्टात का जातो ? या प्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली होती. आपण लेखी उत्तरात तथ्य आढळून येत असल्याचे म्हटले आहे. म्हणजे उत्तरात मान्य केलेले आहे की, हे खरे आहे, चौकशीत तथ्य आहे. तक्रारदाराचे समाधान कसे काय होऊ शकेल ?

**सभापती :** मंत्री महोदयांनी या प्रकरणी अशा प्रकारचे इव्हेंट्स झाल्याचे सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, एखादा गैरप्रकार झाला असेल, संबंधितावर गुन्हा दाखल झाला असेल तर मी चोरी केली, मी पैसे परत दिले म्हणून माझ्यावरील चोरीचा आरोप दूर होऊ शकत नाही. त्यामुळे कदाचित कोर्टाने तशी परवानगी दिली असेल आणि त्याप्रमाणे गुन्हा दाखल झाला असेल. आता आपण पुढील तारांकित प्रश्न चर्चेला घेऊ.

----------

**ता.प्र.क्र.१२६०३ बाबत**

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री आज सन २०२२-२३ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करणार आहेत. माननीय वित्तमंत्री व माननीय वित्त राज्यमंत्री बजेटच्या कामामध्ये व्यस्त आहेत. त्यामुळे मी सदर तारांकित प्रश्न राखून ठेवत आहे. सदर तारांकित प्रश्न नंतर चर्चेला घेण्यात येईल.

---------

यानंतर श्री.सांगळे.......

असुधारित प्रत

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अध्यापकांचा वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युत्तर भत्ता अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांप्रमाणे मंजूर करण्याबाबत

**(५) * ११७६७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रवीण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांच्या तुलनेत राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अध्यापकांना ९.५२ टक्के वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युत्तर भत्ता मिळत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम्सच्या अध्यापकांना वर्षाला वैद्यकीय अभ्यास भत्ता रुपये २ लाख ७० हजार आणि पदव्युत्तर भत्ता रुपये १ लाख ५० हजार मिळतो तर राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांना वैद्यकीय अभ्यास भत्ता रुपये १० हजार आणि पदव्युत्तर भत्ता रुपये ३० हजार मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) १६० शिक्षकांनी डॉ. करमरकर समितीच्या शिफारशीनुसार विविध भत्ते वाढविण्याच्या मागणीसाठी मेडिकलचे प्रभारी अधिष्ठाता यांच्याकडे पदांचे राजीनामे दिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भत्त्यासह इतर भत्ते वाढविण्याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या डॉक्टर नितीन करमरकर समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय तसेच, यामुळे मेडिकलमधील स्नातक व स्नातकोत्तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना काळात रुग्णसेवा देणाऱ्या राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील व रुग्णालयातील अध्यापकांना अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) अध्यापकांप्रमाणे वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युतर भत्ता मंजूर करण्याबाबत व त्यांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला

ता.प्र.क्र.११७६७...

श्री.भाई गिरकर....

वा घेण्यात येत आहे तसेच, स्नातकोत्तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन बंद होऊ नये याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अध्यापकांना ९.५२ टक्के वैद्यकीय अभ्यास भत्ता व पदव्युत्तर भत्ता दिला जातो. तसेच एम्सच्या अध्यापकांना वर्षाला वैद्यकीय अभ्यास भत्ता २ लाख ७० हजार रुपये आणि पदव्युत्तर भत्ता १ लाख ५० हजार रुपये मिळतो तर राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांना वैद्यकीय अभ्यास भत्ता फक्त रुपये १० हजार रुपये आणि पदव्युत्तर भत्ता फक्त ३० हजार रुपये मिळत आहे. ही तफावत कधी दूर करणार आहात ? राज्यातील जे अध्यापक आहेत त्यांना याबाबत लाभ कधी देणार आहात ? या संदर्भात जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे एम्सच्या प्राध्यापकांनी राजीनामे दिलेले आहेत. त्यामुळे या भत्त्यामधील तफावत कधी दूर करणार आहात ?

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला भत्त्यासंबंधीचा विषय हा अंतिम टप्प्यामध्ये आहे. या संदर्भातील सर्व प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणून त्याला मान्यता घेतल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी एम्सच्या धर्तीवर अध्यापकांना भत्ता देण्यासंबंधी सूचना केली आहे. आम्ही त्यासंबंधी अभ्यास करु. आपण समजून घेतले पाहिजे की, एम्सला ऑटोनॉमी आहे. परंतु आपले सर्व जीएमसी ही शासकीय आहेत. त्यामुळे त्यांच्या दर्जामध्ये अंतर आहे. साधारणत: एम्सने ज्या धर्तीवर कार्यवाही केली आहे त्यांच्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ११७६७...

श्री.अमित देशमुख...

सारखी हुबेहूब नसली तरी आपल्याला त्यांच्या धर्तीवर पाऊलावर पाऊल ठेवून सदर भत्त्यांमध्ये सुधारणा व वाढ करण्यासाठी आम्ही अंतिम टप्प्यावर आलो आहोत.

**सभापती :** ठीक आहे.

-----------------

असुधारित प्रत

## मौजे अजिंठा (जि.औरंगाबाद) येथील निजामकालीन बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत

**(६) * ११८८० श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अजिंठा (जि.औरंगाबाद) येथे ११ दरवाजांचा २५० वर्षापुर्वीचा निजामकालीन बंधारा असून, तापी खोरे एकात्मिक जलविकास आराखड्यात या बंधाऱ्याची नोंद नसल्याची माहिती निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जगप्रसिध्द अजिंठा लेणीजवळ निजामकालीन बंधारा चार टप्प्यात अस्तित्वात असून, पुलवजा बंधाऱ्याखाली एक बंधारा व त्याखाली १०० फुट खोल दरीत दोन बंधारे असून, ११ दरवाजाचा बंधारा अजूनही सुस्थितीत असून, तेथील पाणी साठ्याचा वापर सिंचन व पिण्यासाठी केला जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याची दुरुस्ती केल्यास ३ कि.मी. लांबीच्या दरीत कायम स्वरुपी पाणीसाठा होऊन सिंचन प्रकल्पासह पर्यटन स्थळ विकसित होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) उक्त प्रकरणी चौकशी केली असून या एकूण ४ बंधाऱ्यांपैकी टप्पा १ व २ च्या अस्तित्वातील बंधाऱ्यांची आवश्यक विशेष दुरुस्ती व पुनर्रचना करुन व जल संचय क्षेत्रातील गाळ झुडपे काढून साठवण क्षमता पुनर्स्थापित करणे, टप्पा क्र.३ व ४ या बंधाऱ्यांचे बॅरेज मध्ये रुपांतर करुन पुनर्बांधणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करणेसाठी आवश्यक प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ता.प्र.क्र. ११८८०...

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्नातील पहिल्या प्रश्नाच्या उत्तराला "होय" असे उत्तर दिलेले आहे. या संदर्भात कोणाकडून चूक झाली आहे ? याबाबत आपण संबंधितांवर काही कारवाई केली आहे का ? लेखी उत्तरात आवश्यक प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती असल्याचे नमूद केलेले आहे. त्याकरिता निधीसह प्रशासकीय मान्यता कधी देणार आहात ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, तापी खोरे एकात्मिक जलविकास आराखडयात सदर निजामकालीन बंधाऱ्याचा उल्लेख नव्हता याचे प्रमुख कारण असे आहे की, २५० वर्षांपूर्वीचे निजामकालीन बंधारे आहेत. माझ्याकडे त्यांचे फोटो आहेत. त्यापैकी एक बंधारा जवळपास अस्तित्वात नाही. दुसरा बंधारा अनेक वर्षांपासून जवळपास नामशेष झालेला आहे. तेथे एक पुल आहे. त्या पुलाच्या खाली तो बंधारा असून बऱ्या अवस्थेत आहे. दुसरा बंधारा देखील बऱ्यापैकी अवस्थेत आहे. त्या बंधाऱ्याचे गेट टाईट झालेले आहे. तिसऱ्या बंधाऱ्याची दगडं एका ठिकाणी बाहेर पडलेली आहेत. तसेच चौथ्या बंधाऱ्याची आपल्याला पुनर्बांधणी करावी लागेल. तसेच तापी खोरे एकात्मिक जलविकास आराखडयात सदर निजामकालीन बंधाऱ्याचा उल्लेख का झाला नाही याची मी माहिती घेईन. परंतु मला अशी माहिती देण्यात आली आहे की, त्यांचे अस्तित्व फार कमकुवत व किरकोळ असल्यामुळे तेव्हा त्यांचा उल्लेख करण्यात आला नाही. आपल्याकडील नकाशात त्याचा फारसा उल्लेख नसल्यामुळे ते राहून गेले असावे. तापी खोरे एकात्मिक जलविकास आराखडयात सदर निजामकालीन बंधाऱ्याचा उल्लेख नसला तरी त्याची दुरुस्ती करण्यासंबंधी स्थानिक सन्माननीय सदस्यांनी मागील काळात बराच आग्रह केल्यामुळे निजामकालीन बंधाऱ्यांची दुरुस्ती हाती घेणे आवश्यक आहे. त्यापैकी एक बंधारा पूर्णपणे ढासळलेला आहे. तेथे काही शिल्लक राहिलेले नसल्यामुळे नवा बंधारा बांधावा लागेल. एक बंधाऱ्याच्या ठिकाणी काही दगडं खाली पडलेली असल्यामुळे तो पुन्हा रिस्टोअर करण्याचे काम करु. कारण ते २५० वर्षांपूर्वीचे

ता.प्र.क्र. ११८८०...

श्री.जयंत पाटील...

ऐतिहासिक निजामकालीन बंधारे आहेत. पहिल्या दोन बंधाऱ्यांपैकी एका बंधाऱ्याचे गेट टाईट झालेले असल्यामुळे ते रिलिज करुन डागडुजी करणे. दुसऱ्या बंधाऱ्यात त्याच्यावर पुल आहे. तो किल्ल्याबाहेर येणारा रस्ता आहे. त्या पुलाच्या खाली हा बंधारा असून तो अतिशय उत्तम आहे. पर्यटनाकरिता त्या बंधाऱ्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. पर्यटन व दुरुस्तीच्या दृष्टीने जलसंपदा विभागाकडून त्या बंधाऱ्यावर तातडीने खर्च करुन त्याची दुरुस्ती केली जाईल.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, ....

**सभापती :** राज्यमंत्री महोदय, आपण मंत्री महोदयांना येथे प्रश्न कसा विचारु शकतात ? अन्यथा हा मोठा प्रिसिडंट होईल. आपण या संदर्भात मंत्री महोदयांच्या चेंबरमध्ये जाऊन चर्चा करावी.

श्री.अब्दुल सत्तार : सभापती महोदय, ठीक आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात असे सांगितले आहे की, काही बंधारे नष्ट झालेले आहेत व काही बंधारे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आपण ते सर्व बंधारे रिस्टोअर करणार आहात का ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे या संदर्भातील फोटो उपलब्ध आहेत. ते मी सन्माननीय सदस्यांना देतो. त्यातील शेवटच्या फोटोमध्ये तेथे काही नाही. तेथे नवीन बंधारा बांधावा लागेल. तसेच जेथे बंधारे अस्तित्वात आहेत तेथे ते रिस्टोअर केले पाहिजेत. कारण ते २५० वर्षांपूर्वीचे आहेत. पुरातत्त्व विभागाने याकडे अद्याप पाहिलेले नाही. हा देखील प्रश्न आहे. आपण याबाबत त्या विभागाला देखील सांगू.

**सभापती :** ठीक आहे.

-----------------

**राज्यातील बालक, स्तनदा माता व गर्भवतींना पोषण आहार मिळण्याबाबत**

**(७) * १२३४५ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाड्यांमधील सुमारे ७३ लाख बालके आणि ४ लाखाहुन अधिक स्तनदा माता व गर्भवतींना माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२२ पर्यंत महिला व बालविकास विभागाकडून पोषण आहार मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाड्यातील बालकांना व महिलांना अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या बचतगटांचे ३०४ कोटी रुपयांची देयके प्रलंबित असल्याने बचतगट अंगणवाड्यांना पुरवठा करण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात महिला व बालविकास विभागाकडून अंगणवाड्यांना पोषण आहार मिळण्याबाबत तसेच अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या बचतगटांचे देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

राज्यात कोविड-१९ ची साथ सुरु झाल्यामुळे ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार दिनांक २० मार्च, २०२० पासून देण्यात येत आहे. तसेच ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके आणि गरोदर महिला व स्तनदा मातांना नियमितपणे THR देण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.

महिला मंडळ/ बचत गटांची फक्त माहे डिसेंबर, २०२१ अखेर पर्यंतची २० कोटी निधीची देयके प्रलंबित होती. तथापि, रुपये २० कोटी निधी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी जिल्हास्तरावर वितरीत करण्यात आलेला आहे. देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात राज्यात कोविड काळात ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताज्या

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. १२३४५...

डॉ.रणजित पाटील...

आहाराऐवजी टीएचआर देत असल्याचे नमूद केलेले आहे. आता कोविड गेल्यामुळे त्यांना गरम ताजा आहार देणे प्रकृतीच्या व इतर दृष्टीने योग्य राहील. त्यामुळे आपण तो आहार पूर्ववत करणार आहात का ? टीएचआरला आपण फॉर्टीफाईड करु शकतो का ? आपण प्रोटीन्स, विटॅमीन्स घेऊन फॉर्टीफाईड करुन टीएचआर दिल्यास चांगल्या प्रकारे पुरक आहार दिला जाऊ शकतो. या संदर्भात कार्यवाही केली जाणार आहे का ?

ॲड.यशोमती ठाकूर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न बरोबर आहे. कोविड काळात दुसरा पर्याय नसल्यामुळे गरम ताज्या आहाराचे टीएचआरमध्ये रुपांतर करावे लागले. या संदर्भात उच्चाधिकार समितीने निर्णय घेतला होता. बालके आणि स्तनदा मातांपर्यंत अन्नधान्य, फॉर्टीफाईड न्युट्रीशन्स पोहोचणे अतिशय गरजेचे होते. राज्यात आता कोविडची परिस्थिती कमी झाली असल्यामुळे आम्हाला आताच अंगणवाडया सुरु करण्याची परवानगी मिळाली आहे. २-३ दिवसांमध्ये या संदर्भात कार्यवाही केली जाईल. कोविड काळापूर्वी बालके आणि स्तनदा मातांना ज्याप्रमाणे ताजा गरम आहार दिला जात होता त्याप्रमाणे आता सदर आहार दिला जाईल. त्यासाठी आपण टेंडर फ्लोट केलेले असून ते देखील लवकरच येतील. आपण टीएचआर फॉर्टीफाईड करु शकतो. त्यानंतरच तो त्यांना दिला जाईल.

**सभापती :** ठीक आहे.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाशी संलग्नीत अतिविशेषोपचार रुग्णालय येथे रक्त विघटन प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(८) * १२३४९ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी संलग्नीत सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथे ५ वर्षापूर्वी मंजूर झालेला रक्त विघटन प्रकल्प अद्याप सुरू झाले नसल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रुग्णालयात रक्त विघटन सुविधा उपलब्ध नसल्याने गरीब रुग्णांना खाजगी रक्तपेढीतून रक्त आणावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प सुरू करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले असून, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर या दोन्ही संस्था एकाच आवारात असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या रक्तपेढीमार्फत अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथील रुग्णांना आवश्यकतेनुसार रक्तपुरवठा करण्यात येतो.

(३) व (४) अतिविशेषोपचार, नागपूर या संस्थेस रक्त विघटन प्रकल्पाकरीता आवश्यक यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीस अनुदान मंजूर झालेले असून यंत्रसामुग्री खरेदीची कार्यवाही हाफकीन महामंडळस्तरावर सुरु आहे.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३४९...

श्री.रामदास आंबटकर : सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाशी संलग्नीत सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथे ५ वर्षापूर्वी रक्त विघटन प्रकल्प मंजूर झाला होता. परंतु दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी असे निदर्शनास आले की, अद्याप रक्त विघटन प्रकल्प सुरू झालेला नाही. तारांकित प्रश्नामधील दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये हे खरे नाही असे नमूद केलेले आहे. नागपूर हे त्या भागातील सेंटर आहे. अनेक वर्षांपासून सदर रुग्णालय रुग्णांची सेवा करण्यासाठी प्रसिद्ध आहे. अशा प्रकारे सदर रुग्णालयाकरिता ५ वर्षांपूर्वी मंजूर झालेला रक्त विघटन प्रकल्प सुरु न करण्यास कोण जबाबदार आहे ?

यानंतर श्रीमती नाफडे....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२३४९.............

श्री.रामदास आंबटकर....

यामध्ये हाफकिनचे नाव आलेले आहे. प्रत्येक वेळी या सर्व विषयांमध्ये हाफकिन या संस्थेचे नाव येत असते. याची चौकशी होणार काय ? मला असे वाटते की, नागपूर आणि अनन्य विषयामध्ये तसेच, आरोग्य या एकूणच विषयासंदर्भात हे शासन गंभीर आहे का ? असा प्रश्न आता निर्माण होत आहे.

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास आंबटकर यांनी तारांकित प्रश्नाच्या निमित्ताने काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत, त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर या ठिकाणी पाच वर्षापूर्वी जो रक्त विघटन प्रकल्प मंजूर झाला, तो अद्याप सुरु झालेला नाही. हे अंशत: खरे आहे. याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पुरवणी मागण्यांमध्ये मागणी नोंदविली होती, परंतु ती पहिल्यांदा मंजूर होऊ शकली नव्हती. गेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये ती पुरवणी मागणी मंजूर झालेली आहे, आता तो निधी शासनाने हाफकिनक या संस्थेकडे वर्ग केलेला असून त्यासंदर्भातील निविदांचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे की, येथे रुग्णांची हेळसांड होत आहे, यामध्ये मी आपल्याला एवढे सांगू शकतो की, जीएमसी रुग्णालयामध्ये अशीच एक रक्त विघटन करणारी एक यंत्रणा आहे. अति विशेषोपचार रुग्णालयामध्ये त्याचा विस्तार करण्यात येणार होता, यामुळे येथील रुग्ण तेथे रेफर केले जातात, रुग्णांना यामुळे कोणतीही अडचण येत नाही. नागपूरच्या जीएमसी रुग्णालयामध्ये रुग्णांना कोणतीही अडचण होत नाही. परंतु ज्या संख्येने आपल्याला याचा विस्तार करायचा आहे, त्यामध्ये सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये देखील ब्लड सेपरेशन युनिट सुरु करणे अत्यावश्यक आहे. मला असे वाटते की, त्या युनिटचे काम आता अंतिम टप्प्यात येत आहे. येणाऱ्या काही महिन्यांमध्ये ते कार्यान्वित देखील होईल.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, आम्हाला हा प्रकल्प सुरु कधी होणार याची केवळ तारीख पाहिजे आहे. पाच वर्षापूर्वी हा प्रकल्प मंजूर झाला होता. पुरवणी मागणी आता येत आहे. याकरिता मंजूरी केव्हा मिळालेली आहे, याच्या खोलात काही आता मला जायचे नाही.

ता.प्र.क्र.१२३४९.............

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

रक्त विघटन युनिट या या तारखेपासून किंवा या या महिन्यात सुरु होणार आहे, असे निश्चितपणे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांनी तारीख काय असेल, याबाबत विचारणा केलेली आहे. मला असे वाटते की, हाफकिन या संस्थेकडे याकरिता लागणारा निधी वर्ग केलेला असून त्यासंदर्भातील निविदांची कामे सर्व मंजुरीसह अंतिम टप्प्यात आहेत. शासनाच्या माध्यमातून या चर्चेच्या आधारावर हाफकिन या संस्थेला ला सूचना करण्यात येतील. यासंदर्भातील निविदा हाफकिन या संस्थेने तातडीने काढावी, अशा सूचना हाफकिन या संस्थेला शासनाकडून देण्यात येतील. पुढील अधिवेशनाच्या आत सदर रक्त विघटन प्रकल्प सुरु होईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी पूर्ण लक्ष घालून सर्व मेडीकल कॉलेजेसमध्ये कार्य केलेले आहे. त्यांच्या उत्तरामध्ये त्यांनी सांगितलेले आहे की, शासकीय वैद्यकीय महाविद्यायलयाचे विघटन केंद्र आणि अतिविशेषोपचार रुग्णालयाचे सेपरेशन युनिट एकाच कॅम्पसमध्ये असल्याने कामावर परिणाम होत नाही. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल अस्तित्त्वात आले त्यावेळी हे गृहित धरुन आले की, जी रुग्णसंख्या आधी मेडीकल कॉलेजच्या ओपीडीमध्ये अटेंड होते, त्याच्यापेक्षा साधारणत: दीडपट दुप्पट, स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या सर्जरीज आणि येणारे रुग्ण हे पूर्णपणे वेगळे आहेत. मेडीकल कॉलेजचा ताण सांभाळण्याकरिता तेथील सेपरेशन युनिटच सक्षम नाही. तेथे देखील याकरिता वेटिंग आहे. अशा परिस्थितीत तीन-चार-पाच वर्षांपासून पैसे देऊन ठेवले जात आहेत. ते युनिट जर कार्यान्वित होत नसेल तर त्या सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये सर्जरी होणाऱ्या रुग्णांवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. अशा स्थितीत ज्याप्रमाणे आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास आंबटकर यांनी या संदर्भातील हाफकिन संस्था आणि अनेक बाबींवर लक्ष वेधलेले आहे. सस्टेनेबल मेडिसिन देखील हाफकिन संस्थेच्या ॲडमिनिस्ट्रेशनमधून पुरवू शकत नसणार तर कुठेतरी यावर देखील शासनाने मागोवा घेऊन विचार करण्याची आता वेळ आलेली आहे.

ता.प्र.क्र.१२३४९.............

डॉ.रणजित पाटील....

खरच हे पूर्ण राज्याचे काम हाफकिन संस्था हयुमन रिसोर्स अभावी, टेक्नीकल बाबींच्या अभावी वेळेवर करु शकत नसतील तर अशा स्थितीत, या खात्याचे मुख्य म्हणून यासंदर्भात हा निर्णय घेणे गरजेचे आहे. वेळेवर सस्टेनेबल मेडिसिन तरी त्यांच्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याच पध्दतीने ही लॅब देखील गरजेची असताना तत्काळ तेथे लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने आपण आपल्या दालनामध्ये एकंदरीतच राज्यात जेवढे रखडलेले प्रकल्प आहेत, त्यांच्याबाबत एक बैठक घ्यावी.

**सभापती :** सन्माननीय मंत्री महोदयांनी यापूर्वी एका प्रश्नाबाबत बैठक लावलेलीच आहे, त्याच बैठकीत हा देखील प्रश्न चर्चेला घेण्यात यावा.

सन्माननीय मंत्रीमहोदय आपण यासंदर्भात बैठक घेणार आहात का ?

श्री.अमित देशमुख : सभापती महोदय, होय.

------------------------

असुधारित प्रत

**जिल्हा परिषद व खाजगी शाळांतील नेट-सेट (यूजीसी) तसेच पीएच.डी अर्हताधारक शिक्षकांना प्रशासकीय सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ च्या पदांवर सामावून घेण्याबाबत**

**(९) * १२५२४ श्री.किरण सरनाईक, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.नागोराव गाणार, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील नेट-सेट (यूजीसी), पीएच.डी अर्हता धारक शिक्षकांना वर्ग-१ व वर्ग-२ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेण्याबाबत शासनाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल/प्रस्ताव सादर करण्यास सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांप्रमाणेच खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनाही वर्ग-१ व वर्ग-२ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेण्याबाबत शासनाकडे निवेदने प्राप्त होवूनही कोणतीच कार्यवाही न केल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेट-सेट (यूजीसी), पीएच.डी अर्हता धारक आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात नेट-सेट (यूजीसी) तसेच पीएच.डी अर्हता धारक असलेल्या जिल्हा परिषदेच्या, शाळेतील आणि खाजगी शाळेतील शिक्षकांना प्रशासकीय वर्ग-१ व वर्ग-२ गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अब्दूल सत्तार, **श्री.हसन मुश्रीफ यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे, विधानसभा तारांकित प्रश्न क्र. २८८८३ संदर्भात शालेय शिक्षण विभागाने रिक्त पदांची माहिती ग्रामविकास विभागाकडे मागितली होती. त्यासंदर्भात या विभागाकडे

ता.प्र.क्र.१२५२४...

श्री.अब्दूल सत्तार नबी,

निवेदन प्राप्त झाले होते. त्या निवेदनावर सर्व विभागीय आयुक्त यांचेकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.

(२), (३), (४) व (५) महाराष्ट्र शिक्षण सेवेतील गट अ व ब च्या पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत तर, जिल्हा परिषदेतील गट क मधील पदांच्या सेवाप्रवेश नियमाबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभागामार्फत करण्यात येते. राज्य शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदांसाठी अनुक्रमे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६० च्या कलम २७४ खाली तयार केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ खाली अधिसूचित केलेल्या त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनूसार नियुक्त्या केल्या जातात. सध्या उच्च अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना, मागणी केलेल्या पदांवर सामावून घेण्याची तरतूद नसल्यामुळे सदर मागणीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे शक्य नाही, असे करणे असंविधानिक ठरेल.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, राज्यातील जिल्हापरिषद शाळेतील नेट-सेट, युजीसी, पीएच.डी अर्हता धारक शिक्षकांना वर्ग-१, व वर्ग-२ च्या गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य या जिल्हापरिषदेच्या पदावर सामावून घेण्याबाबत शासनाने राज्यातील सर्व जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अभियंता यांना असे अहवाल मागितला होता का ? हे खरे आहे का ? परंतु उत्तरात असे दिसते की, मागणी केलेल्या पदांवर सामावून घेण्याची तरतूद नसल्यामुळे सदर मागणी प्रमाणे पुढील कार्यवाही करणे शक्य नाही, असे करणे असंविधानिक ठरेल, असे म्हटलेले आहे. परंतु माझे म्हणणे आहे की, असे असताना यांच्याकडून असे प्रस्ताव का मागविण्यात आले ? अशा प्रकारे जर नेमणूका देण्यात येणार असतील तर जिल्हापरिषदेतील अर्हताधारक शिक्षकांना, प्राध्यापकांना असल्यास, जिल्हापरिषदेतील शिक्षकांप्रमाणे खाजगी, प्राथमिक, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांनाही वर्ग-१ व वर्ग-२ च्या गट शिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य, जिल्हापरिषद या पदांवर सामावून घेण्याबाबत शासनाकडे निवेदन प्राप्त होऊनही कोणतीही कार्यवाही न करण्याची बाब माहे जानेवारीमध्ये आपल्यामोर आलेली

ता.प्र.क्र.१२५२४

श्री.किरण सरनाईक.....

आहे. आपण कमीत कमी जसे जिल्हापरिषद शिक्षकांचे प्रस्ताव मागविलेले आहेत, तसेच यांचेही मागवून घेण्यात यावे. त्याच्यावर कारवाई जर शासन करीत असेल तर यांना देखील शासनाने गट-अ आणि गट- ब मध्ये त्यांचा समावेश करण्यात यावा, ही मी विनंती करीत आहे. या ठिकाणी उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यात नेट-सेट, तसेच, पीएचडी अर्हताधारक असलेल्या जिल्हापरिषदेच्या शाळेतील, खाजगी शाळेतील शिक्षकांना प्रशासकीय वर्ग-१ आणि वर्ग-२ गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य, जिल्हापरिषद या पदावर सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.किरण सरनाईक : सभापती महोदय, खाजगी शाळेतील शिक्षकांना, जिल्हापरिषदेतील शिक्षकांना अशा प्रकारे वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या गट शिक्षणाकिधारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य या पदांवर पदोन्नती हे शासन देणार आहे का ?

श्री.अब्दूल सत्तार नबी : सभापती महोदय, या संदर्भातील शासनाच्या नियमामध्ये वा धोरणामध्ये धोरणात्मक बदल करावा लागेल. डायरेक्ट अशा प्रकारे ही पदे भरण्याचा कोणताही नियम नाही. याकरिता या प्रश्नाच्या बाबतीत ज्यांनी मागणी केली, त्याप्रमाणे तो खाली फॉरवर्ड करण्यात आला, परंतु याबाबत प्रस्ताव मागितला होता, त्यानंतर अशी पदे भरता येत नाही, अशी यावर शासनाची भूमिका आहे.

श्री.अभिजित वंजारी :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण सरनाईक साहेबांनी अतिशय चांगला प्रश्न विचारलेला आहे. नेट-सेट, पीएच.डी धारक यांची विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी या पदावर नेमणूक झाली पाहिजे, त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा झाला पाहिजे, या उद्देशाने त्यांनी हा प्रश्न तेथे मांडलेला आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, अशा प्रकारची तरतूद नाही. परंतु आमची ही विनंती आहे की, हे प्रपोजल शासन स्वीकारत असेल तर संबंधित कायद्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. कारण महाराष्ट्र जिल्हापरिषद आणि

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.१२५२४
श्री.अभिजित वंजारी......
पंचायत समितीच्या अधिनियम १९६० च्या कलम २०४ मध्ये आपल्याला सुधारणा करावी लागेल, ती सुधारणा प्रस्तावित करण्याकरिता हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अभिजित वंजारी, हा खूप मोठा धोरणात्मक बदल करावा लागेल. सन्माननीय सदस्य श्री.अभिजित वंजारी व इतर संबंधित सन्माननीय सदस्य यांनी याबाबत माननीय मंत्री महोदय यांच्याबरोबर प्रचलित नियम व कायदे याचा उल्लेख करुन हे खरोखर होणार आहे की नाही, याचा एकत्र बसून विचार करावा.

------------

असुधारित प्रत

**दहिखेड (ता.सोनपेठ, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेच्या जागेचा गैरवापर केल्याबाबत**

**(१०) * १२०६१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ११६१० ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिखेड (ता.सोनपेठ, जि.परभणी) येथील सर्व्हे नंबर २२४ मधील जमीन प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान चौकशी समितीची स्थापना केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीचा अहवाल सात दिवसात सादर करावा असे आदेशित असतानाही चौकशी समितीने विहित मुदतीत चौकशी अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात काय नमूद करण्यात आले आहे, तसेच सदरील जागा मूळ शेतकऱ्यास परत देण्याबाबत वा त्याचा मावेजा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अहवालानुसार सदर इमारत दुरुस्त करणे शक्य नसल्याने नियमाप्रमाणे इमारतीचे निर्लेखन करण्यात आले आहे. सदर जमीन परत देण्याबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

( उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

## तामिळनाडू मेडिकल सर्व्हिसेस कॉर्पोरेशनच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(११) * १२०७१ श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११५२२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक १३ व १४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांसोबत तामिळनाडू राज्यातील आरोग्यविषयक योजना व औषधे खरेदी इत्यादी संदर्भात शासकीय अभ्यास दौरा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अभ्यास दौऱ्याच्या अनुषंगाने औषधे खरेदी व आरोग्यविषयक योजनांसंदर्भात तामिळनाडू राज्याच्या मेडीकल सर्व्हिसेस कॉर्पोरेशनच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप आणि सद्य:स्थिती काय आहे तसेच, प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबतचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्याकडून दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाची छाननी चालु आहे.

(३) सदर प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विलास पोतनीस : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझे याबाबत दोनच उप प्रश्न आहेत. सदरहू प्रस्तावाची छाननी करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत रुग्णालयाच्या औषध खरेदीत होणारी अनियमितता पाहता सदरहू प्रस्तावास तातडीने मान्यता ...(अडथळा)

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------------

**पृ.शी./मु.शी. :** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. अब्दुल ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "अकोला ते बाळापूर दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र.सहावर ईगल इन्फ्रा कंपनीच्या डांबर निर्मिती प्लांटमध्ये कंपनी व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे स्फोट होऊन त्यात दोन कामगारांचा झालेला मृत्यू" या विषयावरील श्री.विनायकराव मेटे, वि.प.स. यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक १८१ बाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) यांचे वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचा एकत्रित वार्षिक अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी. :** नियम ९३ अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे आज शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे मी घोषित करीत आहे.

( प्रेस : येथे नियम ९३ च्या सूचना व त्यावरील निर्णय जोडावेत )

-------

असुधारित प्रत

## नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत

**सभापती :** आज शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आहेत.

-------

असुधारित प्रत

## औचित्याच्या मुद्यांबाबत

**सभापती :** सोमवार, दिनांक ७ मार्च, मंगळवार, दिनांक ८ मार्च, बुधवार, दिनांक ९ मार्च, गुरुवार, दिनांक १० मार्च आणि आज शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित करीत आहे.

आज केवळ अपवाद म्हणून दोन-तीन सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्याची परवानगी देत आहे.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

**सभापती** : सभापती महोदय, कांदिवली येथील शौचालयाची सेप्टिक-टँक साफ करताना तीन सफाई कामगारांचा मृत्यू झालेला आहे. अत्यंत दुर्मानवणी अशी घटना घडलेली आहे. सय्यद रौफ वय वर्षे ३५, गणपती वीरस्वामी वय वर्षे ४५ आणि अन्नादुराई वेलमिल वय वर्षे ४० हे तिघेही चिता कँम्पमधील झोपडपट्टीत राहणारे सफाई कामगार होते.

सभापती महोदय, विधानपरिषदेत सन २०१३ मध्ये "द प्रोहिबिशन ऑफ एम्प्लॉयमेंट एज मॅन्युअर स्कॅव्हेंजर्स ॲण्ड देअर रिहॅबिलीटेशन ॲक्ट" असा कायदा केला होता. त्यानुसार मानवी विष्ठा आणि मैला वाहून नेणे किंवा सेप्टिक-टँकमध्ये उतरुन सफाई करणे यासाठी मानवाचा किंवा त्यांच्या श्रमाचा वापर करणे हे बेकायदेशीर ठरविण्यात आलेले आहे. मुळात ही अत्यंत अमानुष अशी प्रथा आहे. जाती व्यवस्थेचे घाणेरडे स्वरुप असून, त्याची मुळे या व्यवसायात आहेत. विधिमंडळाने मानवाने मैला वाहून नेऊ नये म्हणून सर्वोतोपरी प्रयत्न केलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेतील शहरामध्ये अशा प्रकारची घटना घडावी यासारखी दुसरी वेदनादायक गोष्ट नाही.

सभापती महोदय, माझ्या तीन मागण्या आहेत. या घटनेची चौकशी केली पाहिजे. संबंधित कंत्राटदाराच्या विरोधात कारवाई केली पाहिजे. मुंबई महानगरपालिकांनी असे काम करण्यासाठी स्वत:चे कर्मचारी नेमले पाहिजेत. परंतु, हे काम कंत्राटदाराला दिल्यामुळे तो माणसांचा वापर करीत होता. ही कामे माणसांकरवी न करता यंत्रणेच्या सहाय्याने केली पाहिजेत. त्यावेळी माननीय

असुधारित प्रत

सामाजिक न्यायमंत्री श्री. धनंजय मुंडे यांनी देखील सांगितले होते की, अशा सर्व कामांचे यांत्रिकीकरण केल्याशिवाय.... म्हणून शासनाने याबाबत तातडीने निवेदन

श्री. कपिल पाटील...

करावे, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी आहे.

सभापती महोदय, वास्तविक पाहता हा २८९ चा मुद्दा होता.

**सभापती** : शासनाने निवेदन करावे.

----

असुधारित प्रत

श्री. चंद्रशेखर बावनमुळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, विदर्भातील अनेक वर्तमानपत्रात एक बातमी छापून आलेली आहे. त्यासंदर्भात मी संबंधितांसमवेत चर्चा केलेली आहे. विदर्भ बळीराजा प्रकल्प नावाची समिती आहे. ही विदर्भासाठी आहे. यामध्ये सर्व पक्षीय मान्यवरांचा समावेश आहे. अमरावती विभागाच्या सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना काही बाबी शिल्लक राहिल्या, काहींना पैसे देण्याचे राहिले आहेत. या विषयाच्या अनुषंगाने माझ्याकडे संबंधित दहा ते बारा लोकांनी निवेदन दिलेले आहे. शाळेतील लहान मुलांची मागील १५ दिवसांपासून कोणीही भेट घेतलेली नाही. जिल्हाधिकारी किंवा सिंचन विभागाचे अधिकारी गेले नाहीत. त्यांची विचारपुस करण्यासाठी कोणाला तरी पाठविले पाहिजे अशी माझी आग्रही विनंती आहे. शाळेतील ४०० ते ५०० मुले शाळा बंद करुन त्या ठिकाणी बसलेली आहेत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, याची माहिती मला मिळालेली आहे. संबंधित प्रतिनिधींना पुढील आठवड्यात म्हणजे सोमवार, दिनांक १४, मंगळवार, दिनांक १५ आणि बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी मुंबईला बैठकीसाठी उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित केलेले आहे. सदरहू बैठकीत त्यांचे सर्व प्रश्न हाताळले जाणार आहेत. त्यांच्याशी संपर्क झालेला आहे. त्यांना तसा निरोप देखील दिलेला आहे.

----

श्री. किशोर दराडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र केसरी व हिंद केसरी व अन्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यासाठी व महाराष्ट्र केसरी व हिंद केसरी यांच्या मानधनात वाढ करण्यासाठी कोरोनाचे प्रतिबंध उठल्यामुळे महाराष्ट्रातील केसरी व हिंद केसरी स्पर्धा तातडीने आयोजित केल्या जाव्यात यासाठी कुस्ती परिषदेने पावले उचलल्याची माहिती मला मिळाली आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. किशोर दराडे यांना सांगू इच्छितो की, आपण जी मागणी करीत आहात ती मागणी शासनाने मान्य केलेली आहे. आपण सदरहू औचित्याचा मुद्दा पटलावर ठेवावा, अशी माझी सूचना आहे.

श्री. किशोर दराडे : सभापती महोदय, मानधनात वाढ करावी, अशी माझी आग्रही मागणी आहे. त्यांना अतिशय तुटपुंजे मानधन मिळते.

**सभापती** : आमच्याकडे यादी असून, आपली सूचना मान्य करण्यात आलेली आहे.

----

असुधारित प्रत

## माजी सन्माननीय सदस्यांना निळे बॅजेस देण्याबाबत

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अनेक माजी सन्माननीय सदस्य हे २५ ते ३० वर्षापूर्वीचे असल्यामुळे त्यांना कोणीही ओळखत नाही. आपला स्टाफ बदललेला आहे.

**सभापती** : माजी सन्माननीय सदस्यांना कार्ड दिलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, विद्यमान आमदारांना लाल बॅजेस मिळतात.

**सभापती** : आपली मागणी मान्य होणार नाही. त्यांच्यासाठी वेगळी सोय करण्याचा प्रयत्न केला जाईल. बायोमॅट्रिक किंवा इतर पर्यायी सोय करुन दिली जाणार आहे. याविषयी पूर्वीच चर्चा झालेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, याविषयी आपल्यासमवेत परवा चर्चा झालेली आहे. मी माझे म्हणणे पटलावार आणण्यासाठी बोलत आहे. त्यांना विधिमंडळात येताना खूप अडचणी येतात. माजी आमदारांना कार्ड दाखवावे लागते. आपण सर्वजण एक ना एक दिवस माजी आमदार होणार आहोत. माजी सन्माननीय सदस्यांची संख्या ५०० पेक्षा जास्त नाही. या कामासाठी जास्तीचा खर्च येणार नाही. त्यांना निळया रंगाचा बिल्ला देण्यात यावी, अशी माझी आग्रही मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, त्याचा विचार केला जाईल.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक २.०० वाजता पुन्हा सुरु होईल. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करतील.

(सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ८ मिनिटांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत

----------

यानंतर श्री. बोर्डे....

असुधारित प्रत

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करणे.

श्री.शंभुराज देसाई (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

(प्रेस : येथे वित्त मंत्र्यांचे भाषण जोडावे.)

असुधारित प्रत

श्री.शंभुराज देसाई.....

सभापती महोदय, मी आज या ठिकाणी सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केलेला आहे. परंतु जाता जाता एवढेच सांगेन की,

"सुनिये जनाब,
गिरने का डर उनको लगता है जिनके कर्मों में दाग है,
हम तो महाकाल के भक्त है, हमारे तो खून में ही आग है."

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय,

"बहुतसे आ गए हमें गिराने, कुछ न कर पाए,
बीत गए जमाने, डूब गए आसानी से,
हम वह कश्ती नहीं, मिटा सको आप हमें,
ये बात तुम्हारे बस की नहीं."

धन्यवाद.

**सभापती** : सन २०२२-२०२३ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेले पेनड्राईव्ह सुटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहन पार्किंगच्या मोकळ्या जागेत RT-PCR चाचणी केंद्रावर (मंडपामध्ये) करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

असुधारित प्रत

**सभापती**.....

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुन्हा भरेल. सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल. उक्त बैठकीत माननीय विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या नियम २६० च्या प्रस्तावावर चर्चा व मंत्री महोदयांचे उत्तर होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १७ मिनिटांनी, सोमवार, दिनांक १४ मार्च, २०२२ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत